# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:09.01.2025** **वार:गुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भुवनेश्वरमध्ये अठराव्या प्रवासी भारतीय दिवस परिषदेचं औपचारिक उद्घाटन करणार
2. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवस मेघालय आणि ओडिशाच्या दौऱ्यावर
3. तिरुपतीत चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू, तर चाळीस जण जखमी. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आज दुपारी तिरुपतीत आढावा घेणार
4. कटरा ते श्रीनगर दरम्यान जम्मू-श्रीनगर वंदे भारत एक्स्प्रेस लवकरच धावणार. रेल्वे मंत्रालयाची माहिती आणि
5. उत्तर भारतात थंडीची लाट आणखी तीव्र

**<u>प्रवासी भारतीय</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भुवनेश्वरमधील जनता मैदानावर अठराव्या प्रवासी भारतीय दिवस परिषदेचं औपचारिक उद्घाटन करणार आहेत. ही परिषद केंद्र सरकारनं ओडिशा सरकारच्या सहकार्यानं आयोजित केली आहे. जगभरातील भारतीय समुदायातील नागरिकांना एकमेकांशी जोडण्यासाठी हा मंच संधी उपलब्ध करून देतो. यंदा या परिषदेत पन्नास देशांमधील प्रतिनिधींनी सहभागासाठी नोंदणी केली आहे. विकसित भारतासाठी भारतीय समुदायाचं योगदान असं यंदाच्या परिषदेचं ब्रीदवाक्य आहे. पंतप्रधानांचं काल संध्याकाळी भुवनेश्वरमध्ये आगमन झालं. ओडिशाचे राज्यपाल हरिबाबू कंभंपती, मुख्यमंत्री मोहनचरण मांझी आणि केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं.

**<u>राष्ट्रपती दौरा</u>**

या परिषदेचा समारोप उद्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. राष्ट्रपतींचं आज भुवनेश्वरमध्ये आगमन होणार आहे. राष्ट्रपती उद्या परिषदेत प्रवासी भारतीय सन्मान पुरस्कारही प्रदान करणार आहेत. राष्ट्रपती आजपासून ओडिशा आणि मेघालयाच्या दौऱ्यावर आहेत. राष्ट्रपती आज मेघालयमध्ये उमियममध्ये आयसीएआर संशोधन संकुलाच्या सुवर्णमहोत्सव कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<u>तिरुपती चेंगराचेंगरी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिरुपतीमधील चेंगराचेंगरीत मृत्यू पावलेल्यांबाबत दुःख व्यक्त केलं आहे. जखमींना लवकर बरं वाटण्यासाठी त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात सदिच्छा दिल्या आहेत. या दुर्घटनेमुळे फटका बसलेल्यांना राज्य सरकारकडून सर्व प्रकारची मदत केली जात असल्याचंही पंतप्रधानानी म्हटलं आहे. तिरुपती शहरात टोकन देण्यासाठीच्या कक्षात झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला, तर चाळीस जण जखमी झाले आहेत. तिरुमला तिरुपती देवस्थान समितीनं वैकुंठ एकादशी दर्शनासाठी तिरुपतीमध्ये एक लाख वीस हजार टोकन वाटपासाठी तिरुपतीमध्ये 95 कक्ष सुरू केले आहेत. त्यातल्या रामानायडू शाळेजवळच्या कक्षामध्ये काल चेंगराचेंगरी झाली. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. नायडू यांनी परिस्थितीचा आढावा घेतल्याचं देवस्थान समितीचे अध्यक्ष बी. आर. नायडू यांनी म्हटलं आहे. चंद्राबाबू नायडू आज दुपारी तिरुपतीला भेट देऊन आढावा घेणार आहेत. दरम्यान या प्रकरणी चौकशी करण्यात येणार आहे आणि योग्य उपाययोजना केल्या जातील

असं समितीनं स्पष्ट केलं आहे. माहिती देण्यासाठी आणि जखमींना मदत करण्यासाठी 0877-2236007 हा हेल्पलाइन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे.

**श्रीनगर वंदे भारत**

कटरा ते श्रीनगर या दरम्यान धावणारी जम्मू-श्रीनगर वंदे भारत एक्स्प्रेस रेल्वे लवकरच धावेल, असं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. या रेल्वेला आठ डबे असतील आणि हे अंतर केवळ तीन तास आणि दहा मिनिटांमध्ये पार केलं जाईल. बनिहाल ते कटरा या 111 किलोमीटरच्या टप्प्याची सुरक्षाविषयक अंतिम तपासणी सुरू झाल्याचं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. या वर्षी रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू होईल, असं स्पष्ट करण्यात आलं आहे. जम्मू स्थानकाचाही पुनर्विकास सुरू असून तिथं आठ फलाट आणि आधुनिक सेवासुविधा सुरू होणार असल्याचं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. दरम्यान, जम्मू-श्रीनगर वंदे भारत रेल्वे बर्फ पडण्याच्या काळातही चालू राहण्याच्या दृष्टीनं व्यवस्था करण्यात आली आहे. रेल्वेच्या ट्रॅकवर बर्फ पडल्यास सेवांवर परिणाम होऊ नये यासाठी बर्फ हटवणारी रेल्वेही विशिष्ट काळात धावणार आहे.

**अर्थसंकल्प चर्चा**

आगामी अर्थसंकल्पाच्या दृष्टीनं केंद्रीय कृषी आणि शेतकरीकल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. कृषी, ग्रामविकास, भारतीय कृषी संशोधन संस्था आणि भूस्रोत या चार विभागांबाबत चर्चा झाल्याचं चौहान यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं. यापूर्वी शेतकरी आणि संबंधित घटकांशी झालेल्या चर्चेतील सूचना अर्थमंत्र्यांना सांगितल्याचं त्यांनी नमूद केलं.

**इस्रो मोहीम**

भारतीय अवकाश संशोधन संस्थेनं म्हणजे इस्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे.

**रस्तासुरक्षा-गडकरी**

रस्ते अपघातातील जखमी व्यक्तींसाठी रोकडविरहित उपचार योजना सुरू करण्यात आल्याची माहिती केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या वाहतूक मंत्र्यांच्या बैठकीत ते बोलत होते. या योजनेअंतर्गत शासन जखमी व्यक्तीवरील उपचारांसाठी दीड लाख रुपयांपर्यंतची रक्कम देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. धडक आणि पलायन प्रकरणातल्या मृतांच्या वारसांना दोन लाख रुपये दिले जातील अशी माहिती त्यांनी या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. देशात गेल्या वर्षभरात 1 लाख 80 हजार व्यक्तींचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. यातले 66 टक्के 18 ते 34 वर्ष वयोगटातले होते. याचा अर्थ दररोज सरासरी 493 आणि दर तासाला 20 लोकांचा मृत्यु रस्ते अपघातात होत असतो. शाळा महाविद्यालयांच्या प्रवेशद्वारांजवळ योग्य व्यवस्था नसल्यामुळं सुमारे 10 हजार मुलांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

**मुख्यमंत्री-आढावा बैठक**

महाराष्ट्रातल्या कोणत्याही भागातील नागरिकाला राज्यातल्या कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता यावी यासाठी 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशन' संकल्पना राबवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत महसूल विभागाच्या बैठकीत सांगितलं. तसंच घरबसल्या दस्त नोंदणी करण्यासाठी महसूल विषयक काही

दस्त नोंदणीसाठी फेसलेस प्रणाली राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई-मोजणी लागू करण्यात येणार आहे. भूमी अभिलेख विभागातील सर्व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात 30 कार्यालयांमध्ये भू प्रमाण केंद्र सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती त्यांनी दिली.

**अफगाणिस्तान चर्चा**

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री मौलवी आमीर खान मुत्ताकी यांनी काल दुबईत द्विपक्षीय मुद्द्यांवर विविध घडामोडींवर चर्चा केली. अफगाणी नागरिकांशी भारताची ऐतिहासिक मैत्री आणि दोन्ही देशांमधल्या नागरिकांचे दृढ संबंध या चर्चेत अधोरेखित करण्यात आल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं निवेदनात म्हटलं आहे. अफगाणी नागरिकांच्या विकासासाठी तातडीच्या गरजांबाबत भारताची तयारी असल्याचं अफगाणिस्तानकडे कळवण्यात आलं आहे. भारतानं यापूर्वी मानवी भावनेतून अफगाणिस्तानला पन्नास हजार टन गहू, तीनशे टन औषधं, चाळीस हजार लिटर कीटननाशकं, दहा कोटी पोलिओ डोस अशी विविध प्रकारची मदत उपलब्ध करून दिली आहे.

**कुंभमेळा गीते**

कुंभमेळ्यासाठी आकाशवाणी आणि दूरदर्शननं तयार केलेली विशेष गीतं केंद्रीय महिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव यांनी काल मंचस्थ केली. प्रसारभारतीचे अध्यक्ष नवनीतकुमार सेहगल, प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी आदी या प्रसंगी उपस्थित होते. आकाशवाणीनं तयार केलेलं गीत कुंभमेळ्याचं धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित करतं. रतन प्रसन्ना यांनी ते गायलं आहे. त्यांनी आणि संतोष नहार यांनी संगीत दिलं आहे. दूरदर्शननंही महाकुंभ है या गीताची निर्मिती केली आहे. कैलाश खेर यांनी ते गायलं आहे.

**मलेशिया टेनिस**

मलेशिया खुल्या टेनिस स्पर्धेत बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉय आणि मालविका बनसोड यांनी त्यांच्या गटांमध्ये उपांत्यपूर्व फेरीच्या आधीच्या फेरीत प्रवेश केला आहे. प्रणॉयनं कॅनडाच्या ब्रायन यांगवर 21-12,17-21,21-15 असा पराभव केला. मालविकानं मलेशियाच्याच गोह जिन वेईचा 21-15, 21-16 असा पराभव केला. मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी दक्षिण कोरियाच्या संग ह्यून को आणि हाय वोन एओम यांचा 21-13, 21-14 असा पराभव केला. मिश्र दुहेरीतल्या दुसऱ्या सामन्यात सतीश आणि आद्या यांनी भारताच्याच आशित सूर्या आणि अमृता प्रमुतेश यांचा 21-13, 21-15 असा पराभव केला.

**उत्तर भारत लाट**

उत्तर भारतात थंडीची लाट आणखी तीव्र झाली आहे. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये तापमानात आणखी घट होण्याचा अंदाज हवामान विभागानं दिला आहे. हिमाचल प्रदेश, पंजाब, राजस्थान, जम्मू-काश्मीर, लडाख, तसंच मध्य प्रदेशच्या पश्चिम भागामध्ये पुढचे दोन दिवस थंडीची लाट कायम राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. दरम्यान, उत्तर भारतातल्या दाट धुक्यामुळे तिथल्या रेल्वे आणि विमान सेवांवर परिणाम झाला आहे. दिल्लीत येणाऱ्या 25 रेल्वेंना तीन ते चार तास उशीर झाला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**